नियमीत फौ. ख. क्र. १०६/२०२४
सरकार -वि.- संदीप व इतर
नि.क्र. ८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - श्रीहरी बंडू कुशराम,
वय ४८ वर्षे, व्यवसाय – शेत मजुरी,
राहणार – घाटोमरी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक १९.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला नव्हता. मी जात असताना पोलिसांनी माझी सही घेतली. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलिही कार्यवाही केली नव्हती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा वरील सहीला **नि.क्र.९** देण्यात येते.
सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला तास कॉलोनी, ता.भिवापूर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष एक रेतीचा टिप्पर क्रमांक एम.एच.-४०-बी.एल.६१९१ व त्यामध्ये ५ ब्रास रेती आरोपीच्या

ताब्यातुन जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तसा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला व मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. मी प्रकाश धाडसेला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचनविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोसे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २३.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.